अहमदखा पठाण व इतर.
-वि-
शेख रज्जाक.

**-निशाणी ३२ वर आदेश-**
**( पारीत दिनांक १४/११/२०१६ )**

प्रस्तुतचा अर्ज वादींनी वादी क्र.१ चे कायदेशीर प्रतिनिधी यांना रेकॉर्ड वर आणण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादींचे असे कथन आहे की, वादी क्र.१ अहमदखा मुसाखा पठाण हे दिनांक ११/०८/२०१६ रोजी मयत झालेले आहेत. त्यांना अर्जामध्ये नमुद केलेले वादी क्र. १अ ते १ई हे वारस / कायदेशीर प्रतिनिधी आहेत. वादी क्र.१ हे मयत झाले असल्याची बाब वादींस समजताच त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीने म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत नोंदविली. प्रतिवादीने असे कथन केले की, प्रस्तुत अर्जाचे पुष्टयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यांनी अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली.

३. वादींतर्फे विधिज्ञ श्री.टी. ए. शेख व प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. एन. यंडाईत, यांचा युक्तिवाद मी ऐकला.

४. वादी क्र.१ हा दिनांक ११/०८/२०१६ रोजी मयत झालेला आहे ही बाब वादींनी निशाणी क्र.३१ सोबत दाखल केलेल्या मृत्यू प्रमाणपत्राचे आधारे दिसुन येते. तसेच पोलीस पाटील मौजा भोरसी यांनी अर्जदार हे मयत अहमदखा मुसाखा पठाण यांचे वारस आहेत असे प्रमाणपत्र दिलेले आहे. वादी क्र.१अ ते १ई हे मयत वादी अहमदखा मुसाखा पठाण यांची अनुक्रमे पत्नी, मुले व मुली आहेत हे प्रथमदर्शनी वादीने न्यायालयाचे निदर्शनास आणून दिलेले आहे.

५. मुदतीचा कायदा, १९६३ चे आर्टीकल १२० मधील तरतुदींनुसार मयत वादी अथवा प्रतिवादी यांचे कायदेशीर वारसांस त्याचे मृत्यूचे दिनांका पासुन ९० दिवसांचे आंत दाव्याचे कामी रेकॉर्ड वर घेणे आवश्यक असते. वादी क्र.१ हे दिनांक ११/०८/२०१६ रोजी मयत झालेले आहेत. प्रस्तुतचा अर्ज वादीने दिनांक २८/०९/२०१६ रोजी दाखल केलेला आहे. सबब, प्रस्तुत अर्ज हा कायदेशीर तरतुदींच्या प्रकाशात मुदती मध्ये म्हणजे ९० दिवसांचे आंत दाखल करण्यांत आलेला आहे. त्याअनुषंगाने खालील प्रमाणे आदेश करण्यांत येत आहे.

## - आदेश -

१. अर्ज मंजुर करण्यांत येत आहे.

२. मयत वादी क्र.१ चे कायदेशीर प्रतिनिधी म्हणजे भावी वादी क्र.१अ ते १ई यांना रेकॉर्ड वर घेण्यास परवानगी देण्यांत येत आहे.

३. वादींनी सदरची दुरुस्ती १४ दिवसांचे आंत कार्यान्वीत करावी.

स्वा/-.
( पी.एस.कुलकर्णी )
सह-दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
दिनांकः-१४/११/२०१६. चिखली.

"I affirm that the contents of this PDF file Order
are same word for word as per original Order'.
Name of Steno :- Shri. M.S.Joshi,
Order uploaded on :- 09/12/2016.
Date of PDF file :- 09/12/2016.